महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२४०७७४४१

क्र. मासंवि/रवका/न.क्र.२-ब /
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# सुधारपत्र क्र. ३८ दिनांक ०४ / ०७ / २०१७.

## (म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम-२००५)

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या.मधील महिला कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या विशेष रजेचा कालावधी ९० दिवसांवरुन १८० दिवस करणेबाबत.

प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०५.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१६/सेवा-६ दि.१५.०३.२०१७ अन्वये पारित करण्यात आलेल्या सुचनांच्या धर्तीवर महावितरण कंपनीमधील दत्तक मुल घेणा-या महिला कर्मचा-यास म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील सेवाविनियम क्र.५३ (च) नुसार अनुज्ञेय असणारी विशेष रजा ९० दिवसांवरुन १८० दिवस करण्याबाबत मंजूरी प्रदान केली आहे.

२. या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील सेवाविनियम क्र.५३ (च) खालील प्रमाणे सुधारीत करणेत येत आहे.

**<u>सेवाविनियम क्र.५३ (च) : विशेष रजा</u>**

एक) कंपनीमध्ये स्थायी पदांवर कार्यरत दत्तक मुल घेणा-या महिला कर्मचारी खालील प्रमाणे विशेष रजा मिळण्यास पात्र असतील.

१) दत्तक घेण्याच्या दिनांकास मुलाचे वय १ वर्षाच्या आत असेल तर १८० दिवस रजा लागू राहिल.

२) १ वर्षापेक्षा अधिक ते ३ वर्ष वयाचे दत्तक मुल घेतल्यास मुल दत्तक घेण्याच्या दिनांकापासून ९० दिवस रजा लागू राहिल.

सदर रजेचा लाभ दत्तक संस्थेकडून मुल दत्तक घेतल्यास दत्तकग्रहण - पूर्व पोषण देखरेख (pre - adoption foster care) टप्प्यापासून लागू होईल तर इतर प्रकरणी कायदेशीर दत्तक प्रक्रीयेनंतर लागू होईल.

कंपनीतील कार्यरत महिला कर्मचा-यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून विशेष रजा लागू राहील.

(१) मुल दत्तक घेण्यासंबंधातील आवश्यक कागदपत्रे/कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. दत्तक संस्थेकडून मुल दत्तक घेतल्यास रजा मंजूरीसाठी अर्ज करताना दत्तक संस्थेची कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल तथापी न्यायालयीन आदेश अनिवार्य नाही. मात्र न्यायालयाचे अंतिम आदेश प्राप्त झाल्यावर सदर आदेश कार्यालयास सादर करणे कर्मचा-यास बंधनकारक राहील.

(२) दोन पेक्षा कमी अपत्य हयात असलेल्या महिला कर्मचा-यांना सदर विशेष रजा लागू राहिल. १ अपत्य हयात असलेल्या महिला कर्मचा-यांना सदर विशेष रजा घेतल्यावर नंतर प्रसूती रजा / दत्तक मुलासाठी तसेच सरोगसीसाठी असलेली विषेष रजा अनुज्ञेय होणार नाही.

(३) या विशेष रजेसाठी सेवा कालावधीची अट नाही. मात्र ज्या महिला कर्मचा-याची सेवा दोन वर्षापेक्षा कमी झालेली आहे, त्यांनी सदर रजेसाठी अर्ज करतांना कार्यालयास बंधपत्र (बॉड) सादर करणे आवश्यक राहील. त्यानुसार जेव्हा महिला कर्मचारी अशा विशेष रजेवरुन कर्तव्यावर रुजू होईल तेव्हा किंवा सदर रजेला लागून देय व अनुज्ञेय रजा घेतल्यानंतर कर्तव्यावर रुजू झाल्यावर त्यांना कंपनीमध्ये कमीत कमी दोन वर्षे किंवा सेवाविनियम क्र. ११ मध्ये विहित करण्यात आलेल्या बंधपत्राच्या कालावधीतील सेवा यापैकी जो कालावधी जास्त असेल अशा कालावधीकरिता कंपनीची सेवा करणे बंधनकारक राहील. विशेष रजेच्या कालावधीत / रजेला लागून देय व अनुज्ञेय रजा कालावधीत / विशेष रजा संपल्यावर रुजू न होता / विशेष रजा संपल्यावर किंवा देय व अनुज्ञेय रजा घेतल्यानंतर रुजू झाल्यावर, विशेष रजेचा कालावधी वगळून बंधपत्राचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी सदर महिला कर्मचा-यास कंपनीची सेवा सोडून, इतर सेवेत जाण्याकरिता राजीनामा द्यावयाचा असल्यास किंवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा असल्यास अथवा कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास, अशा महिला कर्मचा-याने विशेष रजा म्हणून घेतलेल्या कालावधीतील वेतनाइतके वेतन कंपनीस अदा केल्यानंतरच अशा महिला कर्मचा-यास कंपनीच्या सेवेचा राजीनामा देता येईल किंवा कार्यमुक्त होता येईल.

(४) अशी विशेष रजा घेणा-या महिला कर्मचा-यास रजेला लागून वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय दत्तक घेण्यात येणा-या मुलाचे वय लक्षात घेऊन खालीलप्रमाणे देय रजा अनुज्ञेय राहतील. या अनुज्ञेय रजेमध्ये असाधारण रजेचा अंतर्भाव राहील, मात्र असाधारण रजा निवृत्तीवेतनाच्या व वेतनवाढीच्या प्रयोजनार्थ अर्हताकारी धरण्यात येऊ नये.

एक) दत्तक मुलाचे वय १ महिन्याहून कमी असेल तर १ वर्षाची रजा अनुज्ञेय राहिल.

दोन) दत्तक मुलाचे वय ६ महिने आणि त्याहून जास्त परंतू ७ महिन्याहून कमी असेल तर ६ महिन्यांची रजा अनुज्ञेय राहिल.

तीन) दत्तक मुलाचे वय ९ महिने आणि त्याहून जास्त परंतू १० महिन्याहून कमी असेल तर ३ महिन्यांची रजा अनुज्ञेय राहिल.

(५) या विशेष रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन अनुज्ञेय होईल.

(६) परिविक्षाधीन कालावधीत महिला कर्मचा-यांना विशेष रजा अनुज्ञेय राहणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत सक्षम अधिका-यांची खात्री झाल्यास विशेष रजा मंजूर करता येऊ शकेल. तथापी, संबंधित महिला कर्मचा-याचा परिविक्षाधीन कालावधी विशेष रजेच्या कालावधीइतका वाढविला जाईल.

(७) विशेष रजा कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कर्मचा-यांना लागू राहणार नाही.

दोन) सरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्याकरिता म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम २००५ शी संलग्नित नववी अनुसूचीमध्ये विहित करण्यात आलेले सक्षम अधिकारी हे **" विशेष रजा "** मंजूर करण्यात सक्षम अधिकारी राहतील.

३. कंपनीतील ज्या महिला कर्मचा-यांनी अनाथ मुल दत्तक घेतले आहे व अशी महिला कर्मचारी हा विशेष रजा वाढवण्याबाबतचा आदेश निर्गमित करण्याच्या दिनांकास ९० दिवसांच्या विशेष रजेवर आहे आणि अशा महिला कर्मचा-याचे मुल आदेश निर्गमित करण्याच्या दिनांकास एक वर्षाच्या आत असेल, अशा महिला कर्मचा-यास सध्या अनुज्ञेय असलेल्या विशेष रजेचा ९० दिवसांचा कालावधी वाढवून १८० दिवस एवढा लागू राहिल.

४. सदरची तरतूद या संदर्भात पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या तारखेपासून लागू होईल.

५. सदर सुधारपत्र महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal उपब्लध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\F.N.2-B.doc*
*29 06 2017*